**नि.फौ.के.नं. ३९/२०१९**

**नि. क्र. ६७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०९ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – अशोक सोनु पागार,

**वय** – ६२ वर्षे, **व्यवसाय** – व्यवसायिक दुकानदार,

**राहणार** – पाटगाव, पागारवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे –**

०१. दि. १०/०९/२०१८ रोजी मी माझ्या दुकानातच होतो. मला देवरुख पोलीस स्टेशनला पोलीस तडवी यांनी बोलावले. मला पंचनाम्यावर सही करण्यासाठी बोलावले होते. मी त्यावेळी तेथे एकटाच होतो. श्री. यादव यांनी श्री. राणे यांच्याकडून जो प्लॉट घेतला होता त्या व्यवहाराबाबत हा पंचनामा होता. बाकी काय केले मला माहीती नाही.

०२. साक्षीदाराला दि. १०/०९/२०१८ रोजीच्या पंचनाम्यावरील क्र.१ ची सही दाखवण्यात आली. मी सही करण्यापुर्वी कागद वाचला होता. मला आता हे आठवत नाही की, त्यामध्ये काय लिहीले होते. बरीचे वर्षे झाली. साक्षीदाराने त्याची सही ओळखल्याने सहीला **नि.६८** देण्यात येते. हे मला आठवत नाही की, या सही व्यतीरिक्तही इतर काही सह्या केल्या होत्या अगर कसे.

०३. दहा तारखेला राणे यांनी एका कागदावर सह्या केल्या होत्या. कागदावर सह्या यादव यांना चेक दिल्या बाबत त्यांनी केल्या होत्या. साक्षीदाराला स्वाक्षरी नमुन्याच्या कागदावरील पंचांच्या सह्यामधील त्यांची सही दाखवली. ती सही अ.क्र.०१ ची सही माझीच आहे. साक्षीदाराच्या सहीला **नि.६९** देण्यात येते.

०४. दि. १०/०९/२०१८ च्या पंचनाम्यात लिहीलेला मजकुर बरोबर होता. स्वाक्षरी नमुना पंचनाम्याला **नि.७०** देण्यात येते. त्यानंतर पुन्हा मला सही करण्यासाठी बोलावल्याचे मला आठवत नाही.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

०५. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११/०९/२०१८ रोजी मला पोलीसांनी पोलीस स्टेशनला बोलावले होते व तेथे रश्मी रमेश यादव तीथे हजर होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी माझ्या समक्ष पोलीसांना सांगीतले की, आरोपी जयसिंग गोपाळराव राणे यांनी त्यांच्याकडून १० लाख रुपये स्वीकारुन पैसे दिल्या बाबतची त्यांच्याकडील पावती बुकातील पावती त्यांना दिली. ती मुळ पावती त्या, त्या दिवशी पोलीसांना हजर करत होत्या. साक्षीदाराला अभिलेखावर असलेली नि.२१ येथील Receipt No. 411 ची पावती दाखवण्यात आली. मला दाखवलेली पावती तीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.२१ ची ही पावती पोलीसांनी रश्मी यादव यांच्याकडून जप्त केली.

०६. हे म्हणणे खरे आहे की, ती पावती जप्त केल्याबाबत माझ्या समक्ष पंचनामा झाला आणि त्यावर मी वाचून सही केली. हे म्हणणे खरे आहे की, दि. ११/०९/२०१८ च्या जप्ती पंचनाम्यातील मजकुर खरा आणि बरोबर आहे. सदरच्या पंचनाम्याला **<u>नि.७१</u>** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ ची केस असल्याने मला या पंचनाम्याबाबत व्यवस्थीत सांगण्यात आले नाही. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. आरोपीला पाहील्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून</u> –**

०७. हे म्हणणे खरे आहे की, माझा पानपट्टीचा व्यवसाय आहे व त्याच्या बाजूला अनेक दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तडवी पोलीस माझ्या ओळखीचे होते. पोलीस तडवी माझ्याकडे स्वतः आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या दुकानात आले होते. पोलीस तडवी दहा तारखेला माझ्या दुकानात आले होते. ती वेळ सकाळी ११.०० वा. ची होती.

०८. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी मला सही आवश्यक असल्याने सही करा असे सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्यात निश्चीत काय मजकुर लिहीलेला आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या काही सह्या घेतल्या त्या माझ्या दुकानात घेतल्या.

०९. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी पोलीसांनी स्वतःहुन मला व्यक्तीशः पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, दि. ११/०९/२०१८ रोजी मला साधारण कीती वाजता बोलावण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी लिखाण करुन ठेवले होते त्यावर मी सही केली.

१०. हे म्हणणे खरे आहे की, नि.२१ ची पावती मी आज रोजी प्रथमच न्यायालयात पाहीली. हे म्हणणे खरे आहे की, पावती संदर्भात जो काही मजकुर पोलीसांनी लिहीला असेल तो निश्चीत काय आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/०९/२०१८ व दि. ११/०९/२०१८ चा पंचनामा माझ्या समारे पार पडला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या समक्ष कोणत्याही नमुना स्वाक्ष–या केल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/०९/२०१८ रोजी माझ्या समक्ष फिर्यादीने मुळ पावती पुस्तकातील मुळ पावती पोलीसांना हजर करुन ती जप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.10.15 17:54:16 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १५/१०/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**